# धुळे महानगरपालिका,धुळे

मा.आयुक्त तथा प्रशासक
नगरसचिव कार्यालय

---

## प्रशासकीय महासभा क्रमांक २७

---

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक:-एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१/नवि१४ दि. २९/१२/२०२३ नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदीत अंतर्भुत केलेल्या कलम ४५२ अ (१अ) अन्वये मा.प्रशासक सो. यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार सर्वसाधारण महासभेसाठी प्राप्त झालेल्या प्रस्तावांवर निर्णय घेणेसाठी **शुक्रवार दिनांक ३१/१०/२०२५ सकाळी ११-३० वाजता स्व.दिलीप पायगुडे सभागृहात आयुक्त तथा प्रशासक श्रीमती अमिता दगडे-पाटील यांच्या अध्यक्षतेखाली** संपन्न झाली. सदर बैठकीचे इतिवृत्त

सदर सभेस खालील अधिकारी उपस्थित होते.

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| १. | श्रीमती अमिता दगडे-पाटील | आयुक्त तथा प्रशासक |
| २. | श्रीमती करुणा डहाळे | अति. आयुक्त |
| ३. | श्रीमती स्वालिया मालगावे | करमुल्य निर्धारण तथा कर संलकन अधिकारी |
| ४. | बाळासाहेब तट्टू | मुख्य लेखाअधिकारी |
| ५. | श्री शाहेद शेख मो. शेख | मुख्य लेखापरीक्षक |
| ६. | श्री सुनिलकुमार सुर्यवंशी | उपमुख्यलेखापरीक्षक |
| ७. | श्री.मनोज वाघ | नगरसचिव |
| ८. | श्रीमती संपदा कुलकर्णी | प्र. आरोग्य अधिकारी |
| ९. | श्री प्रदीप चव्हाण | कार्य.अभियंता |
| १०. | श्री संजय मोरे | कार्या.अधिक्षक आस्थापना विभाग |
| ११. | श्रीमती वर्षा घुगरी | कार्य. अभियंता स्थापत्य |
| १२. | श्री नवनित सोनवणे | कार्य. अभियंता पाणीपुरवठा |
| १३. | श्री.चंद्रकांत उगले | उप अभियंता, पाणीपुरवठा विभाग |
| १४. | श्री गितेश सोनार | कनिष्ठ अभियंता, विद्युत विभाग |
| १५. | श्री प्रकाश सोनवणे | उप अभियंता, नगररचना |
| १६. | श्री कमलेश सोनवणे | सहा. अभियंता नगररचना |
| १७. | श्री हेमंत पावटे | सहा. अभियंता बांधकाम |
| १८. | श्री राजेंद्र माईनकर | भांडारपाल, भांडार विभाग |
| १९. | श्री प्रसाद जाधव | अतिक्रमण अधिक्षक |
| २०. | श्री अनिल भडागे | वाहन विभाग प्रमुख |
| २१. | श्रीमती कल्पना जाधव | अभिलेखापाल |
| २२. | श्रीमती मिना सातभाई | समाज विकास अधिकारी |
| २३. | श्री राजेश वसावे | मुख्य स्वच्छता निरीक्षक |
| २४. | लक्ष्मण पाटील | मुख्य स्वच्छता निरीक्षक |
| २५. | गणेश खोंडे | प्रकल्प विभाग |

मा.नगरसचिव वंदे मातरम या राष्ट्रवंदनेसाठी सर्वानी उभे रहावे.

**मा.प्रशासक:-** आजच्या सभेचे कामकाजास सुरूवात करण्यात यावे.

---

**प्रशासक ठराव क्र.२०३** **दिनांक:-३१/१०/२०२५**

---

**वाचा:-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक:-एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१/ नवि१४ दि.२९/१२/२०२३ अन्वये

२. विभाग प्रमुख यांचे कडील प्रस्ताव जा.क्र.धुमपा/ वि.वि. / २०७ दिनांक २७/१०/२०२५

विषय क्रमांक:-२०३ धुळे शहरात विविध ठिकाणी असलेले सार्वजनिक शौचालय येथे बोअरिंग करणेकामी आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

---

वाचा क्र.०१ व उप अभियंता, विद्युत विभाग यांचा वाचा क्रमांक २ चा प्रस्ताव तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदी नुसार प्रशासक, धुळे महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

उप अभियंता सो. बांधकाम विभाग धुळे महानगरपलिका ,धुळे यांच्या लेखी पत्रानुसार स्वच्छ महाराष्ट्र अभियान (२.०) अंतर्गत धुळे मनपा हद्दीतील सार्वजनिक शौचालय दुरुस्ती व नवीन बांधकाम चे कामे सुरु करण्यात आलेले असून १२ ठिकाणी सार्वजनिक शौचालय दुरुस्ती चे काम पूर्ण झाले आहे व ३ ठिकाणी नवीन शौचालय काम सुरु आहे. तसेच धुळे महानगरपलिका हद्दीतील असलेले सार्वजनिक शौचालय दुरुस्ती व नवीन बांधायचे असलेलेल्या शौचालयांच्या यादीनुसार एकूण ७७ पैकी ५८ ठिकाणी बोअरिंग नसल्याचे पत्रामध्ये नमूद केलेले आहे..त्या ठिकाणी पुरेसा पाणीसाठा नाही. त्यामुळे तेथील नागरिकांची गैरसोय होत असल्याचे कळविले आहे. त्यानुसार तसेच प्रत्यक्ष पाहणी केली असता सदर ठिकाणी बोअरवेल करून इलेक्ट्रिक पंपसेट बसविणे बाबत प्रस्तावित आहे.

सदरच्या कामी नवीन बोरवेल करणे, पंपसेट, बोरवेल केबल, सर्विस केबल टाकणे, कंट्रोल panel बसविणे असे अनुषंगिक कामासाठी करण्यासाठी( १८% GST सह ) **शासनदरसूची/ सा.बा./ विद्युत /२०२३-२४ नुसार** अंदाजपत्रकीय खर्च रक्कम रु **४८,८४,६१४ /-** मात्र अपेक्षित आहे. उक्त प्रस्तावानुसार विविध भागात बोअरवेल व पंपसेट बसविणे प्रस्तावित आहे. तथा या पंपसेट करिता महानगरपालिका मार्फत वीज जोडणी घेतली जात नाही. करिता सदरच्या बोरवेल पंपसेट ची वीज जोडणी संबंधित संस्था यांनी करणे व मासिक वीज देयक भरणेची जबाबदारी घेणे अनिवार्य आहे. या शर्तीवर सदर प्रस्ताव मे. महासभेपुढे सादर करण्यात आलेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल विचारात घेता धुळे शहरात विविध ठिकाणी असलेले ५८ सार्वजनिक शौचालय येथे बोअरवेल व पंपसेट बसविणेकामी येणाऱ्या संभाव्य खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. तसेच सदरच्या बोरवेल पंपसेट ची वीज जोडणी संबंधित संस्था यांनी करणे व मासिक वीज देयक भरणेची जबाबदारी घेणे अनिवार्य आहे. तसेच सदर ठिकाणी सोलर सिस्टीम बसविणेबाबतही विभागामार्फत पडताळणी करुन कार्यवाही करावी.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/-x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

---

**प्रशासक ठराव क्र.२०४** **दिनांक:-३१/१०/२०२५**

---

**वाचा:-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक:-एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१/ नवि१४ दि.२९/१२/२०२३ अन्वये

२. विभाग प्रमुख यांचे कडील प्रस्ताव जा.क्र.धुमपा/ आस्था./ ९९५ दिनांक ३०/१०/२०२५

विषय क्रमांक:-२०४ धुळे महानगरपालिकेतील सफाई कामगारांना गणवेश खरेदी करीता त्यांच्या वेतनात रक्कम समाविष्ठ करण्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

---

वाचा क्र.०१ व कार्या. अधिक्षक, आस्थापना विभाग यांचा वाचा क्रमांक २ चा प्रस्ताव तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदी नुसार प्रशासक, धुळे महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

मा.श्री.शेरसिंग रुक्कानसिंग डागोर, अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सफाई कर्मचारी आयोग, मुंबई यांनी धुळे महानगरपालिकेतील (स्त्री/पुरुष) सफाई कामगारांना गणवेश खरेदी करिता त्यांच्या वेतनात रक्कम समाविष्ठ करण्याबाबत निर्देश दिले होते.. यावेळी मा.अध्यक्ष यांनी नागपूर महानगरपालिका, नागपूर यांचेकडील घनकचरा व्यवस्थापन विभाग जा.क्र.एच.ओ.1198/एमआयएससी दिनांक 16/06/2025 रोजीच्या बैठकीचा संदर्भ देत त्या धरती कार्यवाही करण्याबाबत सूचविले आहे.

नागपूर महानगरपालिका, नागपूर यांचेकडील दिनांक 16/06/2025 चे परिपत्रकानुसार नागपूर महानगरपालिकेअंतर्गत घनकचरा व्यवस्थापन विभागाव्दारे शहरातील रस्ते साफ सफाई, चोकेज सफाई, पावसाळी नाली इत्यादी साफ सफाई चे काम हाताळण्यात येते. सदर कर्मचाऱ्यांना प्रचलित पध्दतीनुसार पुरुष कर्मचाऱ्यांना तीन वर्षातुन एकदा दोन गणवेश कापड व शिलाईची रक्कम तसेच महिला कर्मचाऱ्यांना दोन साडी, दोन ब्लाऊल व शिलाईची रक्कम देण्यात येत आहे.

नागपूर महानगरपालिका, नागपूर चे धरतीवर धुळे महानगरपालिकेतील (स्त्री/पुरुष) सफाई कामगारांना गणवेश खरेदी करिता त्यांच्या वेतनात रक्कम समाविष्ठ करण्याबाबतचा प्रस्ताव मे.महासभेपुढे सादर करणेबाबत मा.आयुक्त तथा प्रशासक सो यांनी निर्देश दिलेले आहे. त्यानुसार सदर प्रस्ताव मे. महासभेपुढे सादर केलेला आहे.

उक्त कायार्लयीन अहवाल व प्रस्तावानुसार धुळे महानगरपालिकेतील सफाई कामगारांना गणवेश खरेदी करीता त्यांच्या वेतनात ठरावीक रक्कम समाविष्ठ करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

भागनिहाय स्वच्छता निरीक्षकांनी त्यांच्या नियंत्रणातील स्वच्छता कर्मचाऱ्यांची यादी सादर करुन त्याप्रमाणे भांडार विभागामार्फत गणवेश खरेदी व इतर देय साहित्य यांचा खर्च निश्चीत करावा. व त्यानुसार दरवर्षी जानेवारी महिन्यात त्यांच्या वेतनात सदर रक्कम वर्ग करणेबाबत मुख्य स्वच्छता निरीक्षक तसेच लेखा विभाग यांनी समन्वयाने कार्यवाही करावी.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/-x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

---

**प्रशासक ठराव क्र.२०५** **दिनांक:-३१/१०/२०२५**

---

**वाचा:-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक:-एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१/ नवि१४ दि.२९/१२/२०२३ अन्वये

२. विभाग प्रमुख यांचे कडील प्रस्ताव जा.क्र.धुमपा/ आरोग्य/ २८४ दिनांक ३०/१०/२०२५

विषय क्रमांक:-२०५ धुळे महानगरपालिकेचे मालकीचे रुग्णवाहिकेचे दर कमी करणे व औषधसाठा व इतर सामग्री वाहतुक करणे कामीचे परवानगी मिळणे बाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

---

वाचा क्र.०१ व प्र.आरोग्य अधिकारी, आरोग्य विभाग यांचा वाचा क्रमांक २ चा प्रस्ताव तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदी नुसार प्रशासक, धुळे महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

धुळे महानगरपालिकेच्या मालकीचे आरोग्य विभागाच्या सेवेतील MH 18 BZ 2317 हि रुग्णवाहिका वापर करणेबाबत सन २०११ रोजी महासभेमध्ये ५ रुपये प्रती कि.लो.मी. दर ठरविण्यात आले होते. परंतु दिनांक २०/०२/२०२५ रोजी सदर दर हे महासभेत वाढवुन १४ रुपये प्रती कि.लो.मी. करण्यात आले. सद्या स्थितीत दर हे खुप जास्त असल्याने धुळे शहरातील नागरीक सदर रुग्णवाहिकेचा वापर करत नाही. तसेच बहुताश: वेळा दर जास्त असल्याने नागरीकांकडुन नाराजी व्यक्त करण्यात येत आहे. त्यामुळे नविन दर पत्रकानुसार १४ रुपये प्रती कि.मी च्या ऐवजी दर कमी करण्यात यावे.

सबब धुळे महानगरपालिकेस वाहन उपलब्ध नसल्याने शासनामार्फत धुळे महानगरपालिकेच्या राष्ट्रीय कार्यक्रमांतर्गत आरोग्य विभागास मिळणारा औषधसाठाची वाहतुक करण्यासाठी व इतर सामग्री आणण्यासाठी उदा. नाशिक, पुणे,मुंबई, छ. संभाजी नगर, जळगाव इतरत्र इत्यादी ठिकाणी जाने कामी धुळे महानगरपालिकेची रुग्णवाहिकेचे दर कमी करणेस व रुग्णवाहिका बाहेरगावी नेण्यास परवानगी मिळणेबाबतचा प्रस्ताव मे. महासभेपुढे सादर झालेला आहे.

सदर कार्यालयीन अहवालानुसार सदर सेवा नागरीकांसाठी अत्यावश्यक असल्याने ना नफा ना तोटा या तत्वावर मनपा मालकीच्या रुग्णवाहिकेचा दर प्रति किलोमिटर रु. 10/- मात्र आकारणी करण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच सदर रुग्ण वाहिकेचा वापर फक्त रुग्णांसाठीच करण्यात यावा. अन्य कामांसाठी वाहन विभागामार्फत वाहन उपलब्ध करुन घेणेबाबत कार्यवाही करावी.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/-x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

---

**प्रशासक ठराव क्र.२०६** **दिनांक:-३१/१०/२०२५**

---

**वाचा:-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक:-एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१/ नवि१४ दि.२९/१२/२०२३ अन्वये

२. विभाग प्रमुख यांचे कडील प्रस्ताव जा.क्र.धुमपा/ आरोग्य / २८३ दिनांक ३०/१०/२०२५

विषय क्रमांक:-२०६ धुळे शहरासाठी नविन शववाहिका सुरु करण्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

---

वाचा क्र.०१ व प्र. आरोग्य अधिकारी, आरोग्य विभाग यांचा वाचा क्रमांक २ चा प्रस्ताव तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदी नुसार प्रशासक, धुळे महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

धुळे महानगरपालिकेत जिल्हा परिषद धुळे यांच्या कडुन MH १२ WX ४०१२ या क्रमांकाची शववाहिका प्राप्त झाली आहे. मृतदेहाची वाहतूक करण्यासाठी व मृताच्या नातेवाहीकांना आर्थिक भुर्दंड नसावा व मृतदेहाची हेळसांड न होता सदर शववाहिकेचा वापर करणेकामी व देखभाल दुरुस्तीकरणे कामी शववाहीका ही वाहन विभागांकडे हस्तातंरी करणे बाबत तसेच सदर शववाहिकेवर नविन २ वाहनचालक व २ क्लिनर कर्मचारी ची आस्थापना विभागामार्फत तत्काळ नियुक्ती करुन मिळणेबाबतचा प्रस्ताव मे. महासभेपुढे सादर झालेला आहे.

उक्त प्रस्ताव लक्षात घेता धुळे शहरासाठी महानगरपालिका हददीअंतर्गत नविन शववाहिका विनामुल्य तत्वावर सुरु करण्यास मान्यता देण्यात येत आहे. सदर शववाहिका वाहन विभागाच्या नियंत्रणात राहिल. तसेच सदर शववाहिकेसाठी दोन शिफट मध्ये वाहनचालक व सहाय्यक यांची नियुक्ती आस्थापना विभागामार्फत करण्यात यावी.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/-x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

---

**प्रशासक ठराव क्र.२०७** **दिनांक:-३१/१०/२०२५**

---

**वाचा:-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक:-एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१/ नवि१४ दि.२९/१२/२०२३ अन्वये
२. विभाग प्रमुख यांचे कडील प्रस्ताव जा.क्र.धुमपा/आरोग्य /५६४ दिनांक ३१/१०/२०२५

विषय क्रमांक:-२०७ आरोग्य (स्वच्छता) विभागांतर्गत कार्यरत सफाई कर्मचारी यांचा विमा उतरविणे व याकामी बाबत समिती गठीत करण्यासाठी आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

---

वाचा क्र.०१ व प्र. आरोग्यधिकारी, आरोग्य विभाग यांचा वाचा क्रमांक २ चा प्रस्ताव तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदी नुसार प्रशासक, धुळे महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

दिनांक २९/१०/२०२५ रोजी मा.श्री.शेरसिंग रुक्कानसिंग डागोर, अध्यक्ष (राज्यमंत्री दर्जा) महाराष्ट्र राज्य सफाई कर्मचारी आयोग यांचा धुळे शहरात दौरा झाला होता. सदर दौऱ्यादरम्यान महाराष्ट्र राज्य सफाई कर्मचारी आयोग यांच्या अध्यक्षतेखाली धुळे महानगरपालिकेत बैठक आयोजीत करण्यात आली होती. सदर बैठकीत धुळे महानगरपालिकेत कार्यरत सर्व सफाई कर्मचारी यांचा त्यांच्या सुरक्षिततेकरीता धुळे मनपा मार्फत त्यांचा विमा उतरविण्यात यावा व त्यांना संरक्षण देण्यात यावे तसेच उक्तकामी समिती गठीत करुन कार्यवाही करण्यात यावी याबाबत निर्देश प्राप्त झालेले आहेत.

त्याअनुषंगाने सफाई कर्मचारी यांचा विमा उतरविण्याकामी समिती गठीत करणे हि बाब धोरणात्मक स्वरुपाची असल्याने उक्त बाबत प्रस्ताव मे. महासभेपुढे सादर करण्यात आलेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवालानुसार आरोग्य (स्वच्छता) विभागांतर्गत कार्यरत सफाई कर्मचारी यांचा विमा उतरविणेकामी निविदा प्रसिध्द करुन स्वारस्याची अभिव्यक्ती मागविण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच सदर कामी येणाऱ्या वार्षिक विमा हप्त्याची ५० टक्के रक्कम महानगरपालिका निधीतुन अदा करण्यास मान्यता देण्यात येत आहे. उर्वरीत ५० टक्के रक्कम संबंधित सफाई कामगारांच्या वेतनातुन कपात करावी. तसेच या कार्यवाही साठी म. उपायुक्त सामान्य प्रशासन, म. मुख्य लेखाधिकारी, मुख्य स्वच्छता निरीक्षक तसेच कार्यालयीन अधिक्षक आस्थापना, यांची समिती नियुक्तीस मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/-x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

---

**प्रशासक ठराव क्र.२०८** **दिनांक:-३१/१०/२०२५**

---

**वाचा:-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक:-एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१/ नवि१४ दि.२९/१२/२०२३ अन्वये

२. विभाग प्रमुख यांचे कडील प्रस्ताव जा.क्र.धुमपा/ पा.पु./ ३४० दिनांक ३०/१०/२०२५

विषय क्रमांक:-२०८ धुळे शहरातील सर्व मुख्य मार्ग व उपमार्गातील रस्त्यांवरील खड्डे बुजविणे बाबत येणाऱ्या संभाव्य खर्चास मान्यता देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

---

वाचा क्र.०१ व उपअभियंता, बांधकाम विभाग यांचा वाचा क्रमांक २ चा प्रस्ताव तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदी नुसार प्रशासक, धुळे महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

धुळे महानगरपालिकेच्या अधिकारक्षेत्रातील मुख्य, उपमार्ग व अंतर्गत रस्त्यांवर पावसाळ्यात विविध ठिकाणी खड्डे झालेले आहे. सदर खड्ड्यांमुळे रस्त्यावरील वाहतुकीस अडथळा निर्माण होत असून नागरिकांना प्रवासा दरम्यान मोठ्या प्रमाणावर गैरसोय होत आहे तसेच अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

या संदर्भात शहरातील मा.पदाधिकारी व नागरिकांकडून अनेक तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. रस्त्यांची विद्यमान स्थिती लक्षात घेता सार्वजनिक सोयीसाठी व अपघात टाळण्यासाठी रस्त्यांवरील खड्डे तातडीने बुजविणे

आवश्यक आहे. धुळे शहरातील सर्व मुख्य मार्ग, उपमार्गातील रस्त्यांवरील खड्डे बुजविण्याच्या येणाऱ्या संभाव्य खर्चास मान्यता मिळणेकामी प्रस्ताव मे. महासभेपुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल लक्षात घेता धुळे शहरातील सर्व मुख्य मार्ग व उपमार्गातील रस्त्यांवरील खड्डे बुजविणे बाबत येणाऱ्या संभाव्य खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/-x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**